# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.मनपा/संगणक/ ५०३ /२०२१-२२

दि. 3/02/2022

## // परिपत्रक //

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागात संगणक, संगणक आज्ञावली व इतर साहित्य कार्यरत आहेत. महानगरपालिकेच्या विविध विभागात आपले सरकार, पी.जी.पोर्टल,Mymbmc App. महानगरपालिकेचे संकेतस्थळ, मालमत्ता कर विभाग, जन्म मृत्यु विभाग, पाणीपुरवठा विभाग, स्थानिक संस्था कर, नगररचना विभाग, आस्थापना विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर विभागात संगणक आज्ञावली कार्यरत आहेत. या सर्व आज्ञावलीसाठी युजर आयडी व पासवर्ड प्रदान करणेत आलेले आहेत. युजर आयडी व पासवर्ड बाबत गोपनियता पाळण्याची संगणक आज्ञावलीमध्ये जबाबदारी संबंधित युजरची (वापरकर्त्याची) असुन पासवर्ड वेळोवेळी बदलणे संगणक आज्ञावलीमध्ये केलेल्या कामकाजाचा रिपोर्ट तपासणे आवश्यक आहे तसेच महानगरपालिकेच्या संबंधित विभागातुन बदली झाल्यास, सेवा संपुष्टात आल्यास किंवा इतर शासकीय कार्यालयात बदली झाल्यास युजर आयडी व पासवर्ड बंद करणेबाबत संबंधित विभागास लेखी कळविण्याची सर्वस्वी जबाबदारी युजरची (वापरकर्त्याची) असेल. तरी सदरबाबत खालीलप्रमाणे पासवर्ड पॉलिसीचा वापर करावा.

- कमीत कमी एक मोठ्या लिपितील अक्षर (इंग्रजीमधील)
- कमीत कमी एक लहान लिपितील अक्षर (इंग्रजीमधील)
- कमीत कमी एक नंबर
- कमीत कमी एक non-alphanumeric अक्षर

विभागात कार्यरत संगणकात अनावश्यक फाईल्स, प्रोग्रॅम्स ठेवण्यात येऊ नयेत. संगणकामध्ये ॲन्टी व्हायरस असल्याबाबत खात्री करणे आवश्यक आहे. ॲन्टी व्हायरस install नसल्यास संगणक विभागास लेखी मागणी करण्यात यावी. संगणकास External device चा वापर करु नये. संगणकातील डाटा बाबत गोपनीयता पाळणे आवश्यक आहे. याकामी USB Port संगणक विभागाशी संपर्क साधून पासवर्ड प्रोटेक्ट करुन घेण्यात यावीत. महानगरपालिकेने उपलब्ध करण्यात आलेले संगणक, प्रिंटर, लॅपटॉप व इतर साहित्य कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी वापरावेत.

**(श्री. संजय शिंदे)**
**उपायुक्त (संगणक)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति**

**विभागप्रमुख (सर्व विभाग)**